Research Papers

# “महाराष्ट्रातील शारिरीक शिक्षण विनाअनुदान महाविद्यालये यांचे विविध खेळांच्या विकास सोयी सुविधा : एक अभ्यास”

डॉ. कलेपवार यशवंत धर्माजी
कीदा संचालक
शाहिर आण्णाभाऊसाठे महाविद्यालय
मुखेड ता. मुखेड जि. नांदेड

**सारांश :–**

शारीरिक शिक्षण ही एक नवी आणि तेवढीच उपेक्षित ज्ञानशाखा होय. दुस-या महायुध्दानंतर अमेरिका रशिया जपान तसेच चीन यासारख्या राष्ट्रांमध्ये शारीरिक शिक्षणाचा शास्त्रीयपणे विकास करण्यात आला आहे. शारीरिक शिक्षण व कीदा अभ्यासाला या देशातून वैद्यकीय शिक्षणाएवढेच महत्त्व आहे. त्यामुळे या सर्व देशांमध्ये आंतरराष्ट्रीय ऑलिंम्पिक स्पर्धात सुवर्णपद विजयासाठी कमालीची स्पर्धा दिसून येते. डेलवर्ट यांनी शारीरिक शिक्षणाचे सुत्ररूप विवेचन करताना म्हटले आहे विविध हालचालीतून व्यक्तीला प्राप्त होर्णाया अनुभवांचे संघटन म्हणजे शारीरिक शिक्षण होय.

सी. सी. कॉवेल यांनी शारीरिक शिक्षणाचे हे कार्य अधिक नेमकेपणाने स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते शारीरिक शिक्षण ही एक सामाजिक प्रकिया आहे. स्नायू वर्धक हालचाली व सांघिक खेळातून व्यक्तीच्या वर्तनुकीत बदल घडवून आणला जातो. त्यास शारीरिक शिक्षण असे म्हणतात. (Physical education in social process of changes in the behavior of the human organization, originating primarily form the stimulus of social big muscle-pay and related activities - C.C. Cowed)

विनाअनुदान शारीरिक शिक्षण महाविद्यालय विविध खाजगी संस्थांनी सुरू केले. या महाविद्यालयांच्या कार्याचा आणि त्यांनी विविध खेळ प्रकारात घडविलेल्या योगदानाचा शास्त्रीय व चिकित्सक अभ्यास करणे हा या संशोधनाचा केंद्रबिंदू आहे. महाराष्ट्राच्या विविध भागात 88 विनाअनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालये कार्यरत असून त्यांना एनसीटीईने मान्यता दिलेली आहे. या महाविद्यालयांच्या कीदा प्रकारातील योगदानाची चिकित्सा या संशोधनात करण्यात आली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयात शारीरिक शिक्षणाचा स्वतंत्र विभाग सुरू करण्यात आला. इ. स. 1952 मध्ये भारत सरकारला शारीरिक शिक्षण व रंजन विषयक अनेक प्रश्नांवर सल्ला देण्यासाठी अखिल भारतीय शारीरिक शिक्षण आणि रंजन आयोग स्थापण्यात आला. नंतर भारतातील कीदा विकासाबाबत धोरण आखण्यासाठी संबंधित योजना कार्यान्वित करण्यासाठी इ. स. 1954 मध्ये अखिल भारतीय कीदा मंडळाची स्थापना झाली.

महाराष्ट्र राज्यातील शारीरिक शिक्षण कीदा व युवक विकासाचे कार्य स्वातंत्र्योत्तर काळात इतक्या मोठया प्रमाणात वाढले की शासनास 1970 साली स्वतंत्र कीदा व युवक सेवा विभाग आणि संचालनालय स्थापन करावे लागते. त्याच बरोबर शारीरिक शिक्षणाच्या वरील उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी भारत सराकारने राष्ट्रीय पातळीवर शारीरिक शिक्षण देर्णाया खालील संस्थांची निर्मिती केली.

1. नेताजी सुभाष नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ स्पोर्टस (NIS) पतियाला (पंजाब-1958)
2. नॅशनल कौन्सिल ऑफ रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग
3. बनारस हिंदू विद्यापीठाचे पदविका वर्ग बनारस
4. गव्हर्नमेंट शारीरिक शिक्षण महाविद्यालय श्रीनगर जर्म्कश्मीर.
5. लक्ष्मीबाई नॅशनल कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन ग्वाल्हेर (मध्यप्रदेश 1957)
6. मराठवाडा सांस्कृतिक मंडळाचे शारीरिक शिक्षण महाविद्यालय औरंगाबाद.
7. कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन यवतनाळ.
8. कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन वार्शी

स्वातंत्र्योत्तर काळात प्रशिक्षण संस्थांची संख्या वाढली तरी देखील आज देशातील माध्यमिक शिक्षकाची गरज वरील संस्था भागविण्याचा प्रयत्न करीत आहेत. महाराष्ट्र राज्यातील या शारीरिक शिक्षण महाविद्यालयांनी राज्याच्या कीदा विकासात मोलाचे योगदान दिले आहे.

विनाअनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालये ही राज्याच्या कीदा व युवक धोरणाचा परिपाक आहेत. महाराष्ट्र राज्यातील अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयांमध्ये नियमित बीपीएड / एमपीएड /शारीरिक शिक्षण अभ्यासकमासाठी प्रवेश प्रकिया शासन निर्णय शालेय शिक्षण व कीडा विभाग कमांक 2005 शाशिम-2005/प्र. क. 85/कीयसे-2 दिनांक 20 जुलै 2005 अनुसार सामाईक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test,

C.E.T.) घेऊन केंद्रीभूत पध्दतीने संचालक क्रीडा व युवकसेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे .

महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षण विनाअनुदान महाविद्यालये यांचे विविध खेळांच्या विकास सोयी सुविधा : एक अभ्यास हा विषय संशोधनकर्त्याने शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या भौतिक सुविधा क्रीडा साहित्य प्राचार्य अध्यापक वर्ग या संबंधीचा अभ्यास करण्यासाठी विषय निवडलेला आहे . त्यामुळे विशिष्ट खेळांच्या प्रकारस भक्कम गती देण्यासाठी ही महाविद्यालये पोषक ठरली आहेत .

शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील भौतिक सुविधा उपलब्ध क्रीडा साहित्य प्राचार्य व अध्यापक वर्गाची स्थिती प्रशिक्षण सुविधा व तेथील वातावरण या पैलूंवर भर देऊन प्रत्यक्ष सामाजिक पाहणी करून हा अभ्यास करण्यात आला आहे .

या प्रबंधामध्ये महाराष्ट्र राज्यातील जवळ जवळ 88 विनाअनुदान शारीरिक शिक्षण महाविद्यालये अभ्यासासाठी निवडण्यात आली . याचा अर्थ असा की विदर्भ व मराठवाडा या प्रदेशात विनाअनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयांची संख्या अधिक आहे .

संकल्पना :

सामाजिक शास्त्रात अभ्यास विषयाचा उलगडा करण्यापूर्वी त्या विषयाची बैठक सार रूपाने सांगावी लागते त्यामुळे या प्रकरणात अभ्यासाची आवश्यकता महत्त्व यावर भर देण्यात आला आहे . तसेच सुनिश्चित करण्यात आलेल्या उद्दिष्टांचीही चर्चा करण्यात आली आहे . महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षणाचा इतिहास व विकास कसा झाला तेही या प्रकरणात थोडक्यात मांडले आहे . तसेच शारीरिक शिक्षण या ज्ञानशाखेचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये यांची चर्चा केली आहे . देशात व खास करून पश्चिम भारतात म्हणजे महाराष्ट्रात शारीरिक शिक्षणाचा विकास कशाप्रकारे झाला ते नमूद केले आहे . संशोधन समस्येची ओळख करून घेऊन त्या आधारे भावी संशोधनाची दिशा स्पष्ट केली आहे .

हे प्रकरण अभ्यासविषयाच्या मांडणीसाठी पोषक अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करणारे आहे . तसेच डॉ . पी . व्ही . यंग यांनी म्हटल्याप्रमाणे सामाजिक संशोधनाची भावी दिशा ही सुस्पष्ट संकल्पनांवर अवलंबून असते . त्यामुळे संशोधन प्रक्रियेत योजिलेल्या संकल्पना थोडक्यात स्पष्ट करून त्याआधारे अभ्यास विषयाचा उलगडा करणे हे या संदर्भात महत्त्वाचे असते . त्यामुळे पहिले प्रकरण संकल्पना सांगून शोधाची भावी दिशा स्पष्ट करणारे आहे .

संशोधन पध्दती :

या प्रबंधातील हे प्रकरण संशोधनाच्या पध्दतीबाबत स्पष्टता करणारे आहे . सामाजिक संशोधनात योग्य पध्दती आणि समर्पक आराखडा हे शोधाचे अर्धे यश असते . जॉन बेस्ट यांनी रिसर्च इन एज्युकेशन या ग्रंथात शोध समस्या नवी ज्वलंत आणि तेवढीच व्यवहार्य असावी असे म्हटले आहे . विनाअनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयांची विविध खेळातील कामगिरी हा विषय तुलनेने नवीन असल्याचे आणि या कामगिरीचे मूल्यमापन करताना त्यांच्या यशोपयशाची कारणे व परिणाम याबाबत येथे मीमांसा करावयाची असल्यामुळे अन्वेषणात्मक आराखडा वापरणे अधिक सार्थक ठरते .

महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षणाची वाटचाल :

शारीरिक शिक्षण या ज्ञानशाखेस महाराष्ट्रात ब्रिटीश काळात सुरूवात झाली परंतु या काळात शिक्षणाला अनेक मर्यादा होत्या . महाराष्ट्रात लोकमान्य टिळक युगात 1881 ते 1990 या काळात राष्ट्रीय जागृतिचे वारे वेगाने वाहू लागले . तेंव्हा पश्चिम महाराष्ट्र विदर्भ व मराठवाडा या क्षेत्रात टिळकांच्या राष्ट्रीय शिक्षण विचाराने प्रेरित होऊन अनेक संस्था निघाल्या . आखाडे व व्यायाम शाळांना उत्तेजन देण्यात आले . अमरावती येथे हनुमान व्यायामशाळा संस्था या प्रभावकाळात सुरु झाली . तसेच राष्ट्रीय शिक्षणाचे उद्दिष्ट समोर होऊन मराठवाडा विभागात हिप्परगा अंबेजोगाई सेलू नांदेड येथे अनेक शाळा व महाविद्यालये निघाली . महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाविद्यालयांच्या विकासाला ग्रामीण भागात संधी प्राप्त झाली . सन 1970 या दशकात तालुका पातळीवर अनेक महाविद्यालये निघाली . त्यामध्ये शारीरिक शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण देण्यात येऊलागले व आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांना प्रारंभ झाला . पुढे 1893 नंतर विनाअनुदान धोरणामुळे शारीरिक शिक्षण महाविद्यालये स्थापन होऊन ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रशिक्षण व प्रबोधनाची नवी संधी प्राप्त झाली . ही महाविद्यालये आरंभीच्या काळात अनेक अडचणीतून वाट काढत होती परंतु पुढे त्यांना स्थैर्य आले . भौतिक सुविधांचा अभाव आर्थिक समस्या अशा अनेक अडचणींवर मात करून ही महाविद्यालये वाटचाल करत आहेत .

साहित्याचे समालोचन :

या प्रकारच्या अभ्यासामुळे मागील त्रुटी लक्षात घेऊन विद्यमान अध्ययनाचे वेगळेपण स्पष्ट करणे शक्य झाले आहे . प्रस्तुतचा अभ्यास हा विनाअनुदान शारीरिक शिक्षण महाविद्यालयांच्या केवळ कामगिरीचाच अभ्यास नाही तर त्यामध्ये या महाविद्यालयांनी विविध क्रीडा प्रकारात जे रचनात्मक योगदान घडविले त्याचा आढावा घेऊन ह्या कामगिरीचे मूल्यमापन करावयाचे आहे . असा अभ्यास करण्यापूर्वी पूर्वसंशोधकांनी केलेल्या लेखनाचा आढावा घेतल्यामुळे पुढील शोधाची दिशा अधिक भक्कमपणे मांडणे शक्य झालेले आहे .

पृथक्करण व विश्लेषण :

या प्रकरणात प्रथम सामाजिक पाहणीचा उद्देश सांगून त्यानंतर समकालीन समस्यांवर प्रकाश टाकला आहे . पाच गटात माहितीचे वर्गीकरण केले आहे . त्यामध्ये सर्वसाधारण माहिती खेळातील सहभाग विशिष्ट खेळातील कामगिरी क्रीडा प्रकार निवडीची कारणे विशिष्ट खेळांच्या अडचणी व उपाय तसेच नवीन युगातील नवीन प्रश्नांचीही नोंद घेतली आहे .

हे प्रकरण या संशोधनासाठी केलेल्या सामाजिक पाहणीचा अहवाल सादर करणारे आहे . महाराष्ट्रातील विविध भागात एकूण 88 विनाअनुदानीत शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे आहेत . त्यांचे विद्यापीठनिहाय वर्गीकरण करून या महाविद्यालयांच्या रचना व कार्यपध्दतीवर प्रकाश टाकला आहे . ही सामाजिक पाहणी महाराष्ट्राच्या सर्व प्रदेशात करण्यात आली .

विनाअनुदानित शारीरिक शिक्षण समस्या उपाय व निष्कर्ष :

या प्रकरणामध्ये विनाअनुदानित शारीरिक शिक्षणाचे स्वरूप व व्याप्ती यावर भर दिला आहे . यामध्ये खास करून एनसीटीई ची भूमिका व नियमपध्दती शारीरिक शिक्षण महाविद्यालयांचे कार्य तसेच समस्या व उपाय यावरही प्रकाश टाकला आहे . नॅशनल कौन्सील ऑफ टिचर एज्युकेशन ही एक नियामक संस्था असून ती सुकानुचे कार्य करते . या संस्थेच्या कड निर्बंधामुळे व नियमावलीमुळे विनाअनुदानित शारीरिक शिक्षणाच्या संख्यात्मक वाढीस लगाम बसला आणि या महाविद्यालयांच्या गुणात्मक विकासावर भर देण्यात आला . एनसीटीई करत असलेल्या नियमन पध्दतीचे मार्गदर्शक तत्वांचे विकासावर भर देण्यात आला . एनसीटीई

करत असलेल्या नियमन पध्दतीचे मार्गदर्शक तत्वांचे त्यांच्या अहवालाच्या आधारे तसेच संकेतस्थळाच्या आधारे सुबोध विवेचन करण्यात आले आहे . तसेच प्रथम प्रकरणनिहाय सारांश दिला आहे . त्यानंतर ठळक निष्कर्षांची चर्चा केली आहे . नवे प्रमेय सांगून अभ्यासाची सैध्दांतिक बैठक स्पष्ट केली आहे .

विनाअनुदान शारीरिक शिक्षण महाविद्यालये ही ग्रामीण भागातील क्रीडा विकासासाठी वरदान ठरली आहेत . या महाविद्यालयांच्या उपलब्धतेमुळे पश्चिम महाराष्ट्र विदर्भ मराठवाडा खानदेश या भागात अनेक नवीन खेळाडूंचा शोध घेऊन विविध क्रीडा प्रकारात त्यांचे योगदान शक्य झाले आहे . त्या प्रदेशातील क्रीडा संस्कृती लक्षात घेऊन कुस्ती कबड्डी खो खो हॉलीबॉल क्रिकेट फुटबॉल हॉकी या खेळात विनाअनुदान महाविद्यालयांची आपापल्या प्रदेशातील वातावरणानुसार कार्य केले आहे . स्थानिक क्रीडा संस्कृती हा एक महत्त्वाचा पैलू असतो आणि त्या प्रदेशातील वातावरण लक्षात घेऊन ही क्रीडा संस्कृती त्या त्या महाविद्यालयाला विकसित करावी लागते .

1) महाराष्ट्रातील विनाअनुदातिन शारीरिक शिक्षण महाविद्यालये प्रतिकुल परिस्थितीतून वाटचाल करीत असून त्यांना विविध खेळाच्या विकासात मोलाचे कामगिरी पार पाडली .

2) 1995 ते 2005 या दहा वर्षात या महाविद्यालयांनी ग्रामीण महाराष्ट्र म्हणजे विदर्भ मराठवाडा या विभागात क्रीडा विभागाला मोलाचे सहाय्य केले . भौतिक सुविधांचा अभाव असूनही त्यांनी ग्रामीण लोकांना खेळाच्या विकासात योग्य दिशा दिली आहे .

3) विदर्भ भागात विनाअनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने बास्केट बॉल खोंखो या खेळांना प्रोत्साहन दिले तर मराठवाडा विभागात कबडी व खोंखो या खेळांना गती दिली .

4) विनाअनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालये ग्रामीण भागात क्रीडा प्रशिक्षणार्थी निर्माण करीत असून त्यातील चांगल्या दर्जाचे प्रशिक्षक पुढे येत आहेत .

5) महाराष्ट्रातील विनाअनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयापुढे भौतिक सुविधेचा अभाव आर्थिक साधनसामुग्रीची कमतरता .

6) एनसीटीई च्या कठीण निर्बंधामुळे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचा दर्जा सुधारीत असून या संस्था किमान गुणवत्तेकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न करीत आहेत .

7) शासकीय शारीरिक शिक्षण महाविद्यालये आणि विनाअनुदानित शा . शिक्षण महाविद्यालये यामधील विकासाचे अंतर भरपूर आहे . राज्य सरकारने आपल्या अनुदानाचा धोरणाचा फेरविचार केला पाहिजे .

8) विनाअनुदान शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने दरवर्षी स्वतंत्र क्रीडा स्पर्धाच आयोजन करावे . क्रीडा साहित्य संमेलन क्रीडापत्रकारिता संमेलन शिबीराचे आयोजन उदबोधनवर्ग घ्यावेत .

9) विनाअनुदान शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने एक मंडळ तयार करून त्याआधारे श्र्वेतपत्रिका ग्रंथलेखन परिषदांचे आयोजन करण्यास भर द्यावा .

10) राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय होणारे चर्चासत्रे व परिषदामध्ये शा . शिक्षण महाविद्यालयातील प्राध्यापकांना सहभागी होण्यासाठी एनसीटीई ने विशेष निधी उपलब्ध करून द्यावा .

अशा प्रकारे विनाअनुदानित शारीरिक्षक शिक्षणाचा हा अभ्यास विविध खेळाच्या विकासातील त्यांच्या योगदानावर भर देणारा आहे . उच्च शिक्षणातील विनाअनुदानित शारीरिक शिक्षणाचे क्षेत्र हे उच्च शिक्षणात समस्या निर्माण करीत नसून ते जटीलसी समस्या सोडविण्यासाठी मदत करीत आहेत . या महाविद्यालयाने रचनात्मक विकासाबरोबर विविध क्रीडा प्रकारात स्थानिक खेळाडूंना त्यांच्या प्रादेशिक संस्कृतीनुसार व आवडीनुसार खेळाचे उत्तेजून देऊन मोलाची भर टाकलेली आहे .

संदर्भ सूची ः

1) जैन पीयुष शारीरिक शिक्षा का इतिहास खेल साहित्य केंद्र नवी दिल्ली 2006 .
2) जर्दे श्रीपाल शारीरिक शिक्षणाचा इतिहास अंबा प्रकाशन कोल्हापूर 1996 .
3) काचोळे पा . धो . सामाजिक संशोधन पध्दती कैलाश प्रकाशन औरंगाबाद 1993 .
4) मोहान वि . मी . शारीरिक शिक्षण सिध्दांत एवं तत्वज्ञान मेट्रोपोलिटीन बुक कं . नवी दिल्ली 1981 .
5) घाटोळे रा . ना . समाजशास्त्रीय संशोधन श्री . मंगेश प्रकाशन नागपूर .
6) प्रा . सौ . वाघचौरे माधूरी राष्ट्रासाठी शारीरिक शिक्षण व खेळाची चिरंतन गरज अंबा प्रकाशन पुणे वर्षे 2 अंक 3 .
7) कुलकर्णी द . भि . शारीरिक शिक्षणातील समस्या पथदर्शक अभ्यास क्रीडा तंत्र 3 जून 1993 .
8) वांगवड व्यंकटेश शारीरिक शिक्षण सूक्ष्म अध्यापन क्रीडांगण वर्ष 1 अंक 8 .
9) वांगवाड व्यंकटेश भारतीय क्रीडा विकासासाठी योग्य व कालबध्द कार्यक्रम क्रीडा तंत्र
10) Dr. Gogate S.B. Development of Education in Marathwada.
11) Singh Dharma Encyclopedia of Physical Education, Amol Publication. New Delhi 2005.
12) John W. Lox, Sports Culture & Society a reader on the Sociology of Sports.
13) Dr. N.P. Sharma, Sports Sciences, K.S.K. Publication, New Delhi.
14) Saunders W.B., A Modern Philosophy of Physical Education.
15) Bucher, C.A. Foundation of Physical education.
16) Dharmsingh Encyclopedia of Physical Education Vol.1